स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

एम एम आर डी ए
MMRDA

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

## महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये

## नोटीस

क्र. एसआरओटी/२७००/कुबनप/५६३/२०२३.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख 'उक्त अधिनियम' असा करण्यात आला आहे) नुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (यापूढे ज्याचा उल्लेख 'उक्त प्राधिकरण' असा करण्यात आला आहे) अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्रासाठी (यापूढे ज्याचा उल्लेख 'उक्त अधिसूचित क्षेत्र' असा करण्यात आला आहे) ज्यामध्ये अंबरनाथ नगरपालिका क्षेत्राचा समावेश आहे, त्यासाठी 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणून नियुक्ती केली असून नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासनाने उक्त अधिसूचित क्षेत्राकरिता उक्त अधिनियमाअन्वयेची प्रक्रिया पूर्ण करून विकास योजना दि. २५.०७.२००५ व दि. ११.०८.२००८ रोजीच्या अधिसुचनांव्ये उक्त अधिनियमाच्या कलम ३१ (१) अन्वये मंजूर केलेली आहे;

**आणि ज्याअर्थी,** श्री. शैलम शांताराम जाधव यांनी दि १०.०२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सूर्योदय को. ऑप. हौसिंग सोसायटी, अंबरनाथ मधील भूखंड क्र. ६०४ खालील क्षेत्र उक्त क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेत नजरचुकीने गार्डन या आरक्षण क्र. १२४ मध्ये समाविष्ट केलेले आहे, त्यानुसार सदर बाधित क्षेत्र रहिवास परिमंडळात समाविष्ट करण्याची विनंती केलेली आहे.

**आणि ज्याअर्थी,** याबाबत प्राधिकरणाने नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना दि. २३.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये वस्तुस्थिती कळविलेली असून शासन स्तरावर योग्य निर्णय घ्यावा, असे कळविले होते. त्यावर नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि. ०९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये "सदरचा भूखंड क्र ६०४ हा आरक्षण क्र १२४ मधून वगळणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून फेरबदल प्रस्ताव आपले कार्यालयाकडून शासनास प्राप्त झाल्यास शासन त्यावर गुणवत्तेनुसार निर्णय घेईल", असे या प्राधिकरणास कळवीले आहे. विषयांकित प्रकरणी नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचा निर्णय घेण्याकरिता प्राधिकरणाने उक्त अधिनियमा अन्वयेची फेरबदलाची कार्यवाही करून या प्राधिकरणाचा अहवाल अपेक्षिलेला आहे;

**आणि ज्याअर्थी,** प्राधीकरणाच्या दि. १०.०३.२०२३ रोजीच्या १५४व्या बैठकीमध्ये बाब क्र. ८ नुसार करण्यात आलेल्या ठराव क्र. १६४४ नुसार, अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. १२४ बगीचा ने बाधित होत असलेल्या सुर्योदय को. ऑप. हौसिंग सोसायटी, अंबरनाथ मधील भुखंड क्र. ६०४ मधील वनक्षेत्रात नसलेले ३८०.२५ चौ. मी. इतके क्षेत्र आरक्षण क्र १२४ बगीचा मधून वगळून रहिवास परिमंडळात समाविष्ट करण्याकरिताच्या फेरबदलास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये जमीनवापर फेरबदल करण्यास मान्यता दिलेली आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ३७ मधील सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करण्यासाठी जसे जनतेकडून सुचना/हरकती मागविणेसाठी नोटीस प्रसिध्द करणे, शासनास याबाबत अहवाल सादर करणे यासाठी व अधिनियमानुसार आवश्यक असलेली सर्व कार्यवाही पूर्ण करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत केलेले आहे.

**म्हणून आता,** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ मधील तरतुदींन्वये करावयाच्या उक्त फेरबदलाबाबत जनतेकडून सूचना आणि/किंवा आक्षेप मागविण्यासाठी ही नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

उक्त फेरबदल दर्शविणारा मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा खालील कार्यालयांत कार्यालयीन वेळेमध्ये जनतेच्या निरिक्षणासाठी ठेवण्यात आला आहे.

१. **प्रमुख, नगर रचना,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
६ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व)
मुंबई - ४०० ०५१.

२. **वरिष्ठ नियोजक,**
**मुं.म.प्र.वि.प्रा. उप प्रादेशिक कार्यालय,**
बहुउद्देशिय हॉल, २ रा मजला,
ओसवाल पार्क लगत, पोखरण रोड नं. २ ,
माजिवडा, ठाणे (प.) ४०० ६०१.

३. **जिल्हाधिकारी, ठाणे.**
**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,**
कोर्ट नाका, ठाणे (प.) ४०० ६०१.

४. **मुख्याधिकारी,**
**अंबरनाथ नगरपरिषद,**
गांधी चौक, अंबरनाथ, जि.ठाणे -४२१ ५०१.

ही नोटीस महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत अशा सूचना आणि/किंवा आक्षेप असल्यास वरिष्ठ नियोजक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, उप-प्रादेशिक कार्यालय, बहुउद्देशिय हॉल, २ रा मजला, ओसवाल पार्क लगत, पोखरण रोड नं. २, माजिवाडा, ठाणे (प.) ४०० ६०१ यांचेकडे लेखी स्वरुपात दाखल झालेल्या सूचना आणि/किंवा आक्षेप यांचा उक्त अधिनियमातील तरतुदींनुसार विचार करण्यात येईल. उक्त फेरबदल दर्शविणारा मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा व नोटीस प्राधिकरणाच्या https://mmrda.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर देखील उपलब्ध आहे.

**स्थळ:** मुंबई.
**दिनांक:** 17 APR 2023

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
MMRDA
MUMBAI METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

(श्री. एस. व्ही. आर. श्रीनिवास, भा.प्र.से.)
**महानगर आयुक्त**

# MUMBAI METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

**As per Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**

## NOTICE

क्र. एसआरओटी/२७००/कुबनप/563/२०२३.

**WHEREAS,** the Government of Maharashtra under Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as the 'said Act') appointed Mumbai Metropolitan Region Development Authority (hereinafter referred as 'Authority'), to be the 'Special Planning Authority' for Ambarnath, Kulgao-Badlapur and Surrounding Notified Area (hereinafter referred as 'the said Notified Area') which includes Ambarnath Municipal Council Area and the Urban Development Department (UDD), Government of Maharashtra(GoM) by its Notification dated 25.07.2005 and dated 11.08.2008 has accorded sanction to the Development Plan for the said Notified Area under Section 31 (1) of the said Act;

**AND WHEREAS,** the applicant Shri Shailam Shantaram Jadhav vide his letter dated 10.02.2022 has requested that in the Development Plan of the said notified area, plot no 604, Suryoday CHS, Ambarnath due to drafting error has been included in Reservation no 124, and therefore this affected area shall be included in Residential Zone;

**AND WHEREAS,** in this regard this Authority vide letter dated 23.06.2022 has informed the facts to UDD, GoM to take appropriate decision at their Level. In reply UDD, GoM vide letter dated 09.11.2022 informed that if modification proposal of exclusion of plot no 604 from Reservation no 124 is received from this Authority following due process of law as per section 37 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966, then they will take decision on merits. To take their decision on the said subject UDD, GoM has expected Authority's report following due procedure of modification as per the said act;

**AND WHEREAS,** according to the resolution no 1644 in respect of item no 8 in the 154'th Authority Meeting dated 10.03.2023, the authority has accorded its approval to modify the Development Plan of Ambarnath Kulgao-Badlapur and Surrounding Notified Area under section 37 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 to exclude non forest area of 380.25 sqm of plot no 604, Suryoday CHS, Ambarnath from Reservation no 124 Garden to be included in the Residential Zone. Metropolitan Commissioner has been authorised to complete the legal procedure as per section 37 of the said act like, to publish the notice for inviting suggestions and/or objections from the public, submit the report to the Government in this regard and to complete all the necessary procedure under the said act;

**NOW THEREFORE**, this notice is hereby published under Section 37 of the said Act for inviting suggestions and/or objections from public for the said modification.

The part plan of the sanctioned Development Plan showing the said modification is kept for inspection of the public in the following offices during office hours;

1. **The Chief, Urban Design,**
   **Mumbai Metropolitan Region**
   **Development Authority,**
   6th floor, New MMRDA Building,
   Bandra-Kurla Complex,
   Bandra (E), Mumbai - 400 051.

2. **The Senior Planner,**
   **MMRDA, Sub-Regional Office,**
   Multipurpose Hall, 2nd Floor, Besides
   Oswal Park, Pokharan Road 2, Majiwada
   Thane (W) – 400 601.

3. **The Collector, Thane,**
   **Collector Office,**
   Near Court Naka,
   Thane (W) - 400 601.

4. **Chief Officer,**
   **Ambarnath Municipal Council,**
   Gandhi Chowk, Ambarnath,
   Dist : Thane 421 501.

The suggestions and/or objections received in writing to the Senior Planner, MMRDA Sub-Regional Office, Multipurpose Hall, 2nd Floor, Besides Oswal Park,Pokharan Road 2, Majiwada, Thane (W) – 400601 within 30 (thirty) days from the date of publication of this notice in the Maharashtra Government Gazette will be considered. The Notice and part plan of the sanctioned Development Plan showing the said modification is also available on MMRDA's website at https://mmrda.maharashtra.gov.in.

**Place:** Mumbai.
**Date:** 17 APR 2023

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
MMRDA
MUMBAI METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

(Shri S.V.R. Srinivas, I.A.S.)
**Metropolitan Commissioner**

**Proposed Modification shown on Part Plan of Development Plan of AKBSNA.**




**अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. १२४ बगीचा ने बाधित होत असलेल्या सुर्योदय को. ऑप. हौसिंग सोसायटी, अंबरनाथ मधील भुखंड क्र. ६०४ मधील वनक्षेत्रात नसलेले ३८०.२५ चौ. मी. इतके क्षेत्र रहिवास परिमंडळात समाविष्ट करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर नियोजन अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये करावयाच्या जमीन वापर फेरबदलाच्या कार्यवाहीबाबत.**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये**
**नोटीस**
**क्र. एसआरओटी/२७००/कुबनप/५६३/२०२३**

**Chief, Urban Design**

**Metropolitan Commissioner , MMRDA**